# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.10.2025** **वारःमंगळवार**

---

ठळक बातम्या

- नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी भारत सज्ज असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्रासह ४ राज्यांमध्ये १५ हजार कोटींच्या डाळ खरेदी योजनेला केंद्राची मंजुरी
- दुसऱ्या टप्प्यात बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण करण्याची निवडणूक आयोगाची घोषणा
- आणि
- ज्ञान-भारतम् मिशन आणि पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्ये सामंजस्य करार

आता सविस्तर बातम्या

अमितशहा

मुंबई हे भारताच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाचं स्थान असून ‘इंडिया मेरीटाईम वीक-२०२५’च्या निमित्ताने, भारत नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी सज्ज असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी केलं. शहा यांच्या हस्ते काल मुंबईत भारत सागरी सप्ताह या परिषदेचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. नील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी केंद्र सरकार अनेक धोरणात्मक निर्णय घेत आहे, असं सांगून, शहा यांनी जगभरातील गुंतवणुकदारांना भारतात गुंतवणूक करण्याचं आवाहन केलं...

**<u>बाईट- अमित शहा</u>**

यावेळी केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि  अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

वाढवण बंदरामुळे भविष्यात महाराष्ट्राबरोबरच भारत सागरी शक्तीच्या रूपात उदयाला येईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले--------

**<u>बाईट-मुख्यमंत्री</u>**

या पाच दिवसांच्या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी राज्याच्या बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. यात दिघी आणि जयगड बंदरांचा विकास आणि विस्तार, नवीन जहाजबांधणी प्रकल्प उभारणं, स्वच्छ ऊर्जेवर चालणाऱ्या जहाजांची बांधणी, जलवाहतूक इत्यादी क्षेत्रातल्या सामंजस्य करारांचा समावेश असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान मुंबईत माझगाव गोदीत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठीच्या दोन नौकांचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते काल झालं. या नौकांची चावी आणि नोंदणी प्रमाणपत्रही यावेळी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली.

**<u>डाळखरेदी</u>**

केंद्र सरकारने २०२५-२६च्या खरीप हंगामामध्ये महाराष्ट्र, तेलंगण, ओडिशा आणि मध्य प्रदेश या चार राज्यांतील डाळी आणि तेलबियांच्या, १५ हजार कोटींपेक्षा जास्त खर्चाच्या खरेदी योजनेला मंजुरी दिली आहे. या अंतर्गत राज्यात सोयाबीनची १८ लाख ५० हजार ७०० मेट्रिक टन, उडदाची ३ लाख २५ हजार ६८० मेट्रिक टन आणि मूगाची ३३ हजार मेट्रिक टन खरेदी केली जाणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल ही घोषणा केली. प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान; म्हणजेच पीएम-आशा अंतर्गत या योजनेला मंजुरी देण्यात आली. या संदर्भात चौहान यांनी काल राज्यांच्या कृषिमंत्र्यांबरोबर दूरस्थ माध्यमातून बैठक घेतली. देशातील शेतकऱ्यांचं उत्पन्न सुरक्षित ठेवण्याला केंद्र सरकारचं सर्वोच्च प्राधान्य आहे, असं शिवराज सिंह चौहान यावेळी म्हणाले.

**<u>सरन्यायाधीश</u>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढील सरन्यायाधीश पदासाठी न्यायमूर्ती सुर्य कांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत, त्यानंतर न्यायमूर्ती सुर्यकांत सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील.

**<u>मतदारयाद्यापूल</u>**

देशभरातल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून प्रारंभ होत आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. महाराष्ट्र वगळता बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ही मोहीम राबवली जाणार असल्याचं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं. मतदार यादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी ही मोहीम राबवण्यात येत असल्याचं ते म्हणाले. पुनरीक्षणाचा पहिला टप्पा बिहारमध्ये राबवण्यात आला. या टप्प्यात सुधारित मतदार याद्यांबाबत एकही आक्षेप नोंदवला गेला नसल्याचं, ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात**

**भांडारकरकरार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात उद्घाटन केलेल्या “ज्ञान-भारतम्” मिशनशी पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचा सामंजस्य करार नुकताच झाला. ऐकुया याबाबत अधिक माहिती

**स्क्रिप्ट**

केंद्र सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्लीत झालेल्या एका कार्यक्रमामध्ये “ज्ञान-भारतम्” मिशन आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्ये करार करण्यात आला. संस्कृति-मंत्रालयाच्या वतीने सहसचिव समर नंदा आणि भांडारकर संस्थेच्या वतीने नियामक परिषदेचे सदस्य मनोज एरंडे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. संस्थेचे निबंधक डॉ. श्रीनन्द बापट यावेळी उपस्थित होते. हा करार पाच वर्षांचा आहे; त्याद्वारे भांडारकर संस्थेला ज्ञान-भारतम् मिशनमध्ये क्लस्टर सेंटरचा दर्जा देण्यात आला आहे. संस्थेच्या स्वतःच्या संग्रहाबरोबरच इतर संस्था आणि व्यक्तींच्या संग्रहांमधील हस्तलिखितांची नोंदणी,

जतन, डिजिटायझेशन, भाषांतर, प्रकाशन आणि हस्तलिखितांवरील संशोधन अशा विविध बाबींची जबाबदारी या आता भांडारकर संस्थेवर सोपवण्यात आली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरू आणि नितीन जळुकर यांच्यासह माधुरी कुलकर्णी पुणे.

**आठवले**

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीची एकजूट भक्कम राहील, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हटलं आहे. ते काल नागपूरमध्ये बोलत होते. महापालिकेची निवडणूक ही महायुती जिंकेल या भीतीपोटी महाविकास आघाडी निवडणूक आयोगावर नाहक आरोप करत असल्याचं मतही आठवले यांनी व्यक्त केलं.

**दक्षतासप्ताह**

सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा वाढवण्यासाठी आणि भ्रष्टाचारमुक्त समाजाचं ध्येय साध्य करण्यासाठी देशभरात कालपासून दक्षता जागरूकता सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. ‘दक्षता - आपली सामुहिक जबाबदारी,’ ही यंदाच्या जागरुकता सप्ताहाची संकल्पना आहे. विविध मंत्रालये, विभाग, सार्वजनिक उपक्रम, बँका, सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयात प्रतिज्ञा घेऊन सप्ताहाची सुरुवात झाली.

**रनफॉरयुनिटीपूल**

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त येत्या ३१ तारखेला देशभरात रन फॉर युनिटी या दौडचं आयोजन करण्यात आलं आहे. या दौडमधे सहभागी

होऊन वल्लभभाई पटेलांच्या अखंड भारत या दृष्टिकोनाचा सन्मान करावा, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला केलं आहे.

**<u>सन्मानकार्यक्रमअहिल्यानगर</u>**

अहिल्यानगर तसंच लातूर, बीड, धाराशिव, आणि सोलापूर या पाच जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या मेळाव्याचं आयोजन अहिल्यानगरच्या सैनिकी प्रशिक्षण संस्थेत नुकतंच करण्यात आलं होतं. यावेळी दक्षिण महाराष्ट्र आणि गोवा उपक्षेत्राचे जनरल ऑफिसर कमांडिंग विशाल अग्रवाल यांच्या हस्ते वीर माता, वीर पत्नी, वीरपिता यांचा सन्मान करण्यात आला. मेजर जनरल विक्रम वर्मा यांच्यासह विविध अधिकारी आणि माजी सैनिक यावेळी उपस्थित होते.

**<u>रक्ततुटवडा</u>**

पुण्यातील रक्तपेढ्यांमध्ये सध्या रक्ताचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे अनेक रुग्णालयांमध्ये शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागत आहेत. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येऊन रक्तपेढ्यांमध्ये रक्तदान करावं असं आवाहन रक्तपेढ्या आणि स्वयंसेवी संस्थांनी केलं आहे.

**<u>कार्तिकीयात्राप्रतापसरनाईक</u>**

कार्तिकी यात्रेसाठी राज्यभरातुन पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी एसटीच्या १ हजार १५० अतिरिक्त बसगाड्या सोडण्यात येणार आहेत. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल ही माहिती दिली.

**<u>पाऊसरायगडसांगलीकोल्हापूर</u>**

राज्याच्या विविध भागात कालही पावसानं हजेरी लावली. नंदुरबार जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसानं कापुस, मिरची, बाजरी, कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. पुणे, सांगली, कोल्हापूरमध्येही काल पाऊस पडला. रत्नागिरी जिल्ह्यात  दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसानं पिकांचं नुकसान झालं आहे.

हवामान

येत्या दोन दिवसात विदर्भ आणि कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<u>शेवटी पुन्हा ठळक बातम्या</u>**

- **<u>नवीन सागरी इतिहास घडवण्यासाठी भारत सज्ज असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन</u>**
- **<u>महाराष्ट्रासह ४ राज्यांमध्ये १५ हजार कोटींच्या डाळ खरेदी योजनेला केंद्राची मंजुरी</u>**
- **<u>दुसऱ्या टप्प्यात बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे मतदारयाद्यांचं सखोल पुनरीक्षण करण्याची निवडणूक आयोगाची घोषणा</u>**
- **<u>आणि</u>**

- <u>ज्ञान-भारतम् मिशन आणि पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेमध्ये सामंजस्य करार</u>

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार